# माया पंडित
# यांच्या तीन कविता

### ते आहेत खोचून पाय

ते आहेत खोचून पाय
उभे या घराच्या हरेक पायरीवर
प्रत्येक वळणावर रस्त्याच्या मोकळ्या
आणि पायवाटांच्या निरूंद कोपऱ्यांवर.
स्तब्ध न्याहाळतात रोखलेले डोळे मला
डांबराच्या फटीतून, वितळणाऱ्या घळींतून
कणाकणानं विघटित होत जाणाऱ्या
स्थळकाळाच्या चिरफळीतून.

मी लेखाजोखा द्यायला हवाय त्यांना
माझ्या भुकेचा, वस्त्रांचा, शरीरास्त्रांचा
की त्यांना येतील उतरवता
चिरगुटे सारी माझ्या गाभ्यावरून
नेता येईल फरपटत रस्त्यावरून
येईल ओरबाडता सगळी ओल
माझ्या अणूरेणूत एकेका स्वप्नाच्या
रुतून बसलेल्या गाठींवरुन.

ते अवकाशात आहेत सभोवताली
हवाबंद केलाय त्यांनी माझ्या श्वासातला प्राण
कप्पेबंद केलेल्या त्यांच्या चौकोनात माझी
नजर होत रहाते छिन्न जाणीव निष्प्राण
आणि अणूरेणूत तगमगत रहाते
त्यांनी उद्ध्वस्त केलेल्या वसाहतींची
जगण्याची निष्पाप तहान.

परिवर्तनाचा वाटसरू

### करूणेला मोहताज बनलेली

करूणेला मोहताज बनलेली
ही सारी दुनिया
खचत चाललीय त्यांनी
सभोवताली केलेल्या वैराणात;
पहचान हरवलेल्या बुजगावण्यांच्या
बीभत्स बुजबुजाटात.

कशी झाली खुडुक बिनवारशी
आजवर पेरलेली तमाम बियाणी
पैकेकऱ्यांचाच कुंदा नासाज
हरेक पात्याचा गळा घोटत
उठवतोय आपली अघोर निशाणी.

पेरापेरात तरारलंय वीष
नि फांदीफांदीवर लटकतेय
बिचल झालेली आस
कोरडकीच्या ढेकळात गाडतोय
मान आवळत
द्वेषाचा राक्षसी फास.

दोन हातांनी धरून ठेवेल का कोणी
पावलांखाली खचत चाललेली धरती
आटाआट करून एक हिरवे रोप
कुठला आणील का बळीराजा
या शुष्क सांगाड्यांच्या वरती?

## सबूर

पायाखाली तुडवून झालाय आता
मोठा भूभाग जगाचा तुमचा
आणि रोवलेही आहेत झेंडे इथेतिथे
फिरवीत द्वाही तुमच्या कत्तलसत्तेची जगावर
असे वाटतेय तुम्हाला की पोचलो शेवटी
एकदाचे आपण आपल्या सुयोग्य थाळावर.
आता आपलेच मत्ता आहे हे सारे जग
नि सत्ताही आपलीच इथल्या
स्थायी आणि अनंत स्थळकाळावर.
ही झाडे, ही माती, ही पानेफुलेपक्षी
वाऱ्याच्या झुळकांनी इथल्या पाण्यावर
ओढलेली आपल्याच ताकदीची नक्षी
इथल्या भुईवरच्या सामान्यांच्या हरेक श्वासात
गुंफलेला आहे आपलाच इतमामी बडेजाव
आणि आपल्याच असण्याचा गजर
इथे नाचणाऱ्या क:पदार्थ अणूरेणूंच्या ओठांवर.

पण सबूर आता उन्हे सरसावतील पुढे
नि झाडे सावल्या सोडून देत परजतील
आडवेतिडवे आपल्या फांद्यांवरचे काटेकुटे
जमीन घेईल ओढून अंगावरची खाल
नि बोचके करून देईल फेकून कळणारही नाही
दूरवरच्या कोणत्या खोल काळ्या गिरीकुहरात
विस्मृतीच्या धुक्याचे हात येतील सरसरतपुढे
पहातापहाता पडतील गळ्याभोवती त्याचे तलमतिढे
शोषून घेतील श्वास घशात कोरडपेर करतील
सभोवतालच्या अवकाशात प्राण अलगद सरतील.

चार दिवस आला आहात चार अंगुळ जागेवर
पाहुणचार घ्या आता हवा असेल जरा तर
कसली सत्ता कसला गजर हे घर तुमचे नाही
कसले झेंडे फडकी चार! घुमवताय कसली द्वाही
मातीवरती ओढून चार रेघा सीमा आखल्यात जरी
तोरा चिमूट निमूट मिटेल, काय तुमची मातब्बरी!

**माया पंडित**
हैदराबाद
mayapandit@gmail.com